Bahar – February 2015



Valentine's

Special

अनुक्रमणिका

नमस्कार मंडळी,

सर्व प्रथम तुम्हा सर्वांना हया प्रेमळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आजच्या हया प्रेमाचा संदेश देणाऱ्या दिवशी बहर प्रकाशित करताना आम्हाला खुप आनंद होत आहे. हया महिन्यातल्या बहरचे मुखपृष्ठ जसे प्रेमाचा संदेश देते तसेच आपल्या मधल्या प्रेमवीरांनी खुप सुंदर कविता लिहील्या आहेत.

ह्या विशेष दिवशी आणि हया महिन्याच्या बहर मधे दोन मनाचे मिलन, तिची आठवण आल्यावर काय वटते, राधा कृष्णाचे प्रेम कसे होते हे कवींनी त्यांच्या काव्यातुन मांडले आहे. त्याच बरोबर आपण हा दिवस का साजरा करतो त्या बद्द्ल थोडी माहीती देणारा एक लेख , अबूधाबी त ही राहुन पुणेकर कसे , आणि फोटोग्राफि कशी असावी हया बद्द्लची माहिती देणारा आणि त्याच बरोबर आपल्या बालमित्रांनी काढलेल्या चित्रे, अशा विविध प्रकारच्या साहित्यांनी नटलेला बहर तुम्हा सर्वां पर्यंत पोहोचवतानां आम्हाला खुप आनंद होत आहे.

या अंकाचे तुम्ही मनापासुन स्वागत कराल अशी आम्ही आशा करतो. तुमच्या हया अंकाबद्द्ल सुचना , प्रतिक्रीया अवश्य पाठवा. आम्ही त्याचे स्वागत करू.

आपल्या सुचना आम्हाला खालिल ई मेल वर पाठवा.

maharashramandalad@gmail.com

संपादकीय ....

सै.कोमल तावडे

श्री.निहाल मांडके

सै. राधिका लपालिकर

प्रेमाचा दिवस......

१४ फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन डे म्हणजे प्रेम व्यक्त करण्याचा दिवस म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. एक प्रेमाचे प्रेमाचे प्रतिक असणारा हा दिवस प्रत्येकासाठी खास असतो. खरं तर व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यासाठी किंवा मनातले प्रेम व्यक्त करण्यासाठी कोणत्याही दिवसाची गरज नसते. ३६५ दिवस म्हणजेच प्रत्येकाने रोज प्रेम करायला हवे आणि ते व्यक्त सुद्धा करायला पाहिजे. कवि कुसुमाग्रजांनी 'प्रेम म्हणजे काय असतं ...

हे फार सुंदर शब्दांमध्ये वर्णिले आहे ते असे....

प्रेम म्हणजे काय असतं

चातकाला पावसाशी असतं !

टपोऱ्या दवबिंदूला गवताच्या पात्याशी असतं !!

प्रेम म्हणजे काय असतं

जे चंद्राला चांदण्यांशी असतं!

सळसळणाऱ्या वाऱ्याला गर्जणाऱ्या ढगांशी असतं !!

प्रेम म्हणजे काय असतं

जे फुलपाखराला फुलाशी असतं काजव्याला घनदाट अंधाराशी असतं !!

गुणगुणनाऱ्या पतंगाला मिणमिणत्या दिव्याशी असतं!!

प्रेम म्हणजे काय असतं

जे हळुवारपणे जपायचं असतं

हृदयात साठवून ठेवायच असतं

कित्ती ही दु;ख झालं तरी हसतं जगायचं असतं !!

प्रेम म्हणजे काय असतं

जे फक्त शेवटपर्यंत तिच्या आणि आपल्यात असतं

त्याच्यात आणि आपल्यात असतं.....

म्हणुनच व्हॅलेंटाईन डे हा खुप खास असतो या दिवशी असं वाटतं की त्याने तिने आपल्या जवळ असावे. थोडयाशा क्षणाच्या सहवासा साठी आतुर होऊन जातो ही तर खरी जन्मांतरीच्या नात्यांची सुरुवात आहे...

प्रेमाचे प्रतिक असणारा हा दिवस अर्थातच व्हॅलेन्टाईन डे हा का साजरा का केला जातो याविषयी थोडक्यात जाणुन घेऊ या....

Valentines Day History



On the 14th of February each year we celebrate Valentine's Day - a day that celebrates Love. People celebrate this day by giving flowers, candy and cards to those near and dear. So you must be wondering as to why is this Day called Valentine's Day. Who was Saint Valentines? And what is the association between the two? Well for this one needs to refer to history, precisely the history of Valentine's Day.

History of Valentine's Day

Legend has it that Valentine was a priest who served during third century Rome. There was an Emperor at that time by the name of Claudius II. Emperor Claudius II decided that single men made better soldiers than those that were married. With this thought in mind he outlawed marriage for young men in hopes of building a stronger military base. Supposedly, Valentine decided this decree just wasn't fair and chose to marry young couples secretly. When Emperor Claudius II found out about Valentine's actions he had him put to death.

During the third century their lived a priest called Valentine in Rome. At that time Rome was being ruled by Claudius II. Claudius ll believed that soldiers who are unmarried worked better than those who are married and had family responsibilities. There was a rule in Rome that said that declared young men should not get married hoping to build a very strong military. Valentine was dead against this rule and he decided to get couples married secretly. In no time Emperor Claudius ll found out what Valentines was up to secretly and he immediately ordered to put him to death. To commemorate the sacrifice made by St. Valentine for the cause of love.

However there are other versions of the legend too. One of this says that Valentine was an imprisoned man who fell in love with his jailor's daughter. A day before being put to death he sent a letter to his beloved signing of with the words 'Your Valentine'. In a way we can

say that the first Valentine was sent by Valentine himself. This note was written on February 14, 269 A.D. This is a tradition that has become a part of our lives and now we follow the same. From here starts this tradition of gifting cards, goodies and gifts to your special on this day.

In the seventeenth century Great Britain started celebrating Valentine's Day. In the eighteenth century it became popular practice that people close to each other started celebrating this day by exchanging gifts, token of love and handwritten notes. By the end of the century people also stared exchanging printed cards to express what their heartfelt. Worldwide this tradition has started to pick up and card exchange, gifts exchange has become a tradition now. In India too people have started acknowledging bonds of love and Valentine's Day is very much a part of our lives too.

Another popular name we hear on Valentine's Day is that of Cupid. Cupid, which in Latin is cupido, "desire". In Roman mythology Cupid is the son of Venus, goddess of love. His counterpart in Greek mythology is Eros, god of love. Cupid is often said to be a mischievous boy who goes around wounding both gods and humans with his arrows, causing them to fall in love.

Perhaps we'll never know the true identity and story behind the man named St. Valentine, but this much is for sure...February has been the month to celebrate love for a long time, dating clear back to the Middle Ages. Record has it that after Christmas the greatest number of cards are sent on Valentine's Day!!AstroSage.com wishes you a very Happy Valentine's Day!! Believe in the power of love and let love bring the best in you.



दोन मनांचे मिलण

दोन हातांची गुंफण

का न सांगताच सर्व काही समजणे

सुख – दु;खाची वळणे खुप काही शिकवुन गेली

वर्षानुवर्षेची गुपिते अलगदपणे उलगडली.

कळले तडजोडीचे महत्त्व.

अन आली भरती प्रेमाची, समाधानाची

आयुष्याच्या या वळणावर देशिल का तुझी साथ?

असेच राहू चालत आपण गुंफुन हातात हात



खुप काही सांगायचे राहुनच गेले

मनीचे भाव विरून गेले.

नाही जमली शब्दांची गुंफण

मर्यादेचे आले त्याला कुंपण

ओठातले शब्द ओठातच राहिले

खुप काही सांगायचे राहुनच गेले

माझ्या मनीचे भाव तुझ्या मनी ना पोहोचले

प्रेम हे सारे एकतर्फीच राहिले

डोळयात माझ्या तुला ते ना दिसले

खुप काही सांगायचे राहुनच गेले.

सौ. मेघा हेमंत गिरधर.

आकाश चांदणे

आकाश चांदण्याचे यावे माझ्या कवेत

गंध तुझा येता या मोकळया हवेत

पाऊल मंद मंद वाटे मला सुरात

येणे तुझे असे की चाहुल माझ्या उरात

शिल्प भासे मला तुझ्या गुढ दिसण्यात

चमकून वीज जाते तुझ्या शुभ्र हसण्यात

शब्द तुच असतेस मुखी माझ्या बोलण्यात

कळी तुच होतेस फुल माझे फुलण्यात



संग्रहित

तिची आठवणं....त्याचं झुरणं..

मी तुझ्या साठी झुरतोय गं

झुरण काय असतं ते आज मला कळतय गं

पहाटे तुझी रेशमाची मिठी सकाळी प्रेमळ बोलणं

उठल्यावर गोजिरवाणे रुप पाहुन माझ ते मोहून जाणं

प्रेमाने बडबडत तू केलेली माझी ऑफिससाठी तयारी

नाष्टाचा डबा, कधी टाय, कधी कधी मेकप चेहऱ्यावरी

सगळ सगळ मला आठवतय गं...

सकाळी लगबगीने उठुन तु केलेल्या नाष्टयाचा आठवतोय गोडवा

दारापर्यंत असे तूझी सोबत व जाताना प्रेमाचा ओलावा

ऑफिसमधुन दिवसभर फोनवर तुझे माझे प्रेमळ संवाद

'तुम्ही लवकर घरी या' अशी असे तुझी माझ्या वाक्याला दाद

सगळ सगळ मला आठवतय गं.....

ऑफिसमधुन आल्यावर तुझा हसरा लाजरा चेहरा

मस्त चहा व उत्साही बेत करी थकवा दूर सारा

बागेत, शॉपींग मॉल मधे संध्याकाळी फिरताना तुझी सोबत

कधी मागणी, कधी गाऱ्हाणी तर कधी रागाने 'नाथा नाही मी बोलत'

सगळ सगळ मला आठवतय गं.....

शुक्रवारी सुट्टीच्या दिवशी आपली असे मज्जाच मज्जा

दिवसभर एकमेकाची सोबत तू माझी राणी मी तुझा राज

तुझी होती माझ्या बरोबर प्रेमाची सावली

तू नसताना आठवण येते पावलोपावली

मी तेझ्या साठी झुरतोय गं

झुरणं काय असतं ते आज मला कळतय गं.....

राजन तावडे.....

राधा	कृष्ण
अरे कृष्णा मुरारी	अग राधा बावरी
ही तुझी बासरी	घे जरा ऐकुनी
वाजता उठे कळ	वाजते फक्त तुझ्यासाठी
माझ्या या अंतरी	माझी ही बासरी
सांगु काय तुला	नसांगताही कळे मला
व्यथा माझीरे कान्हा	राधा तुझा अबोला
झालीरे मी अबोली	तुझ्याचसाठी येते भरती
तुला फुटेना पान्हा	वेडे माझ्या ह्दयाला
यशोदेच्या नंदलाला	केल्या जरी रासलीला
करीशी तु रासलीला	वाजवुन मी बासरीला
विसरुनी तुझ्या राधेला	प्रत्येक गोपीकेत राधे
वाजवितो का बासरीला	पाहिले मी तुला

यमुना भरली श्यामा आकंठ बुडालो मी

आज अश्रुंनी माझ्या तुझिया प्रेमात राधे

नाही भेटलास तु मग का बुडविते

बुडवेल गोकुळास तुझ्या तु आपुल्या गोकुळाला



संग्रहित


छायाचित्रण - एक कला -
कॅमेरा एक्स्पोजर :

कॅमेरा उद्भासन (एक्स्पोजर) म्हणजेच कॅमेऱ्याच्या प्रतिमासंवेदकावर (sensor) पडणारा प्रतिएकक प्रकाश. कॅमेरा उद्भासन किती जास्त किंवा किती कमी आहे यावर कॅमेऱ्यात कैद होणारी प्रतिमा किती गडद किंवा किती फिकट येईल हे अवलंबून असते. सुयोग्य एक्स्पोज झालेली प्रतिमा मिळवणे-न मिळवणे हे कॅमेऱ्याच्या फक्त तीन सेटिंग्जवर अवलंबून असते. हे तीनही घटक एकमेकांशी संबंधित असतात आणि डीएस्एल्आर कॅमेऱ्याचा सर्वात मोठा फायदा हा की, तुम्ही तुमच्या मर्जीनुसार हे तिन्ही घटक हवे तसे कमीजास्त करू शकता. काही हायएण्ड पॉइंट-ॲण्ड-शूट कॅमेऱ्यांत तशी सोय असते, पण त्यात हवी तेवढी रेंज मिळत नाही.

एक्स्पोजर म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी आपण मानवी डोळ्याचे उदाहरण घेऊया. तुम्हाला कधी वाचलेलं / शिकलेलं आठवतंय का? आपला डोळा खुप प्रकाश असेल तेव्हा बुबुळामधला पडदा छोटा करतो आणि खुप अंधार असला कि हाच पडदा मोठ्ठा होतो. कशासाठी करत असेल बरं असं? कमी प्रकाशात जास्तीत जास्त प्रकाश डोळ्याच्या पटलापर्यंत जायला हवा, तर आपल्याला नीट दिसेल म्हणून कमी प्रकाशात पडदा मोठा होतो. आता जास्त प्रकाशात मोठा पडदा उघडला तर खुप प्रकाश पटला पर्यंत जाऊन पटल खराब होऊ नये म्हणून डोळ्याचा पडदा छोटा होतो. कमाल आहे ना निसर्गाची!
तुमच्या माझ्या कॅमेऱ्यात सुद्धा माणसाने निसर्गाची हीच संकल्पना वापरली आहे.

कॅमेरा उद्‌भासन नियंत्रित करणारे तीन घटक - आयएसओ स्पीड, अॅपर्चर आणि शटर इन्टर्वल हे अनुक्रमे डोळ्यांच्या प्रकाशसंवेदक पेशी, बाहुल्या आणि पापण्या यांच्याप्रमाणेच काम करतात. ह्या प्रत्येक घटकाचे उद्‌भासनाच्या प्रक्रियेतील स्थान व कार्य आपण पाहूया.

एक्स्पोजर ट्रायअॅन्गल (उद्‌भासन त्रिकोण)



वरील प्रतिमा पुरेशी बोलकी आहे. कॅमेऱ्याच्या एक्स्पोजरवर परिणाम करणारे तीन घटक वर दर्शविले आहेत (Aperture, Shuter Speed And ISO).

प्रतिमा नीट पाहिल्यास त्यातील प्रत्येक घटकाचे मूल्य कमीजास्त केल्यास काय परिणाम मिळतो हे दाखवलेआहे.


ॲपर्चर म्हणजे काय?

ॲपर्चर म्हणजे एक छिद्र ज्यामधून कॅमेरा सेन्सर /फिल्म वर किती प्रकाश पाठवायचा ते ठरवलं जातं. छिद्र जेवढं मोठं तितका जास्त प्रकाश सेन्सर वर पडणार आणि छिद्र जितकं छोटं तितका कमी प्रकाश लेन्स वर पडणार. सहाजिकच हे छिद्र हव तसं छोटं / मोठं करायला काही यंत्रणा हवी. ही यंत्रणा पाकळ्यांच्या स्वरुपात असते. एकावर एक येणाऱ्या पाकळ्या सगळ्या बंद असतील तर चक्क उमललेल्या चाफ्याच्या फुलाच्या मधल्या भागासारखी दिसते. या पाकळ्यांना iris diaphragm असे म्हणतात.

कॅमेऱ्याच्या लेन्स साठी हे ॲपर्चर एफ स्टॉप मध्ये निर्देशित करतात. एफ स्टॉप म्हणजे फोकल लेंग्थ आणि अपेर्चर डायमीटर यांचा रेशो. उदा. f/४.५. या मध्ये जितका नंबर छोता तितक ॲपर्चर मोठं म्हणजेच जास्त प्रकाश आत जातो. खालच्या चित्रामध्ये बघितलं तर f/२.८ (छोटा नंबर) हे जास्त ॲपर्चर आणि f/२२ हा छोटा अपेर्चर (जास्त नंबर)

छोटा नंबर - जास्त ॲपर्चर - जास्त प्रकाश - उदा. f/२.८

मोठा नंबर - कमी ॲपर्चर - कमी प्रकाश - उदा. f/२२



ॲपर्चर जेव्हा जास्त असते (कमी नंबर) (आणि फोटो सबजेक्टचे लेन्स पासूनचे अंतर जेव्हा जास्त) तेव्हा फोकस मध्ये येणारे प्रतल (Plane) अगदी पातळ असते. आणि ॲपर्चर जेव्हा कमी तेव्हा जास्त दूरपर्यंतचा भाग फोकस मध्ये दिसतो.

ॲपर्चर हे लेन्सचे स्पेसिफिकेशन म्हणून सांगितले जाते. आणि या ॲपर्चरच्या व्हेल्यूवर लेन्सच्या किमती बदलतात. जितके जास्त ॲपर्चर असेल (कमी नं.) तितकी लेन्स महाग. सहसा ज्या लेन्सचे ॲपर्चर f/२.८ पेक्षा जास्त असते त्या लेन्सना फास्ट लेन्स असे संबोधले जाते. सहाजिकच जितके ॲपर्चर जास्त तितका जास्त प्रकाश लेन्स मधून जाणार. अशा लेन्स कमी प्रकाश असणाऱ्या ठिकाणी अतिशय उत्तम. मग कमी प्रकाशातही शटरस्पीड जास्त न वाढवता चांगले फोटो काढता येतात.

पण प्रत्येक लेन्सचा एक स्वीट स्पॉट असतो. म्हणजे जरी लेन्सच सर्वाधिक ॲपर्चर f/१.८ आहे तरी ती लेन्स f/१.८ला तिचा सर्वोत्तम पर्फोर्मंस देत नाही तर एखाडा स्टोप कमी केल्यावर म्हणजे f/२.८ ला देते. तसाच मिनिमम ॲपर्चर f/२२ आहे तरी f/२२ला फोटो काढला तर खुप डीफ्राक्शन होऊन फोटो चांगला येत नाही या वेळी f/१६ f/११ असे सेट करावे लागते. हे स्वत:च्या आणि इतरांच्या अनुभवानेच कळते.

झूम लेन्स मध्ये हे ॲपर्चर स्पेसिफिकेशन रेंज मध्ये सांगितले जाते जसे १००-४००मिमी f/४.५ ते f/६. याचा अर्थ लेन्स १०० ते ४०० मिमी झूम करते १०० मिमिला f/४.५ मिळतो आणि ४०० मिमिला f/६ मिळतो.

आपल्या कॅमेर्यातील अॅपर्चर प्रायोरिटी (Av for Canon, A for Nikon) मोडचा चांगला अभ्यास व वापर केल्यास अॅपर्चरचा कीती छान उपयोग होऊ शकतो हे समजुन येईल.







कॅमेरा अॅपर्चर मोडवर ठेवायचा आणि आपल्याकडील असलेल्या प्रत्येक लेन्सने अॅपर्चर बदलत वेगवेगळ्या प्रतिमा घ्यायच्या. आपल्या एक लक्षात येईल की वेगवेगळ्या लेन्स ने एकाच अॅपर्चर वर घेतलेल्या प्रतिमेच्या आऊट ऑफ़ फ़ोकस चा परिणाम वेगवेगळा असु शकतो. म्हणजेच एका लेन्सचे f/८ हे अॅपर्चर आणि दुसऱ्या लेन्सचे f/८ अॅपर्चर चा परिणाम वेगवेगळा असू शकतो.



सुंदर असा ब्लर बॅकग्राउंड परिणाम येण्याकरता पुढील साध्या ४ गोष्टी लक्षात ठेवाव्यात :

१. सर्वात कमी अॅपर्चर सेट करा. (आधी सांगीतल्याप्रमाणे वेगवेगळ्या लेन्सचा एकाच अॅपर्चर वरचा आऊट ऑफ़ फ़ोकस चा परिणाम वेगवेगळा असु शकतो. म्हणून योग्य परिणाम मिळेपर्यंत प्रयोग करत रहा).

२. जास्तीत जास्त फ़ोकल लेन्थ पर्यंत लेन्सचा झूम वाढवा.


३. विषयवस्तुच्या जास्तीत जास्त जवळ जा.

४. विषयवस्तु व बॅकग्राउंड याच्यात जास्त अंतर ठेवा.

ब्लर बॅकग्राउंड परिणाम दाखवण्याकरिता खाली २ प्रकाशचित्रे देत आहे.







अजय पडवळ............

ajay.padwal@gmail.com

क्रमशः

अबुधाबीतही सर्वकाही..........

मी मूळची कोकणातली. शिक्षण– व्यवसायानिमित्त मी पुण्यात राहिले. नंतर 'ताराबलम् चंद्रबलम्' झालं अन् अबूधाबीत वास्तव्याचा योग आला.

कोकणी माणसं ही प्रेमळ ,दुसऱ्याच्या जिवाला जीव देणारी. त्यामुळे आईच्या पंखाखालून निघून उच्च शिक्षणासाठी भरारी घ्यायची वेळ आली त्या वेळेस मनात अनामिक पण साहजिक अशी हुरहूर होतीच. पुण्यात आल्यावर तिथे मी कोकणचा आपलेपणा शोधू लागले. शोधता शोधता जिवाला जीव देणारं मित्रमंडळ मिळालं. एक बळ आलं, आत्मनिर्भरता आली. पुण्याने मला व्यावहारिकपणा शिकवला, जीवन जगायला शिकवलं, स्वावलंबन शिकवलं, कॉलेजजीवनातल्या कधीही विस्मृतीत न जाणाऱ्या अमूल्य आठवणीही मला पुण्यानेच दिल्या. अजूनही आठवतं ते झपाटल्यासारखा अभ्यास करणं अन् तितकीच मजा करणं.

तसं पाहिलं तर बऱ्या–वाईट गोष्टी सगळीकडेच असतात, पण त्यातलं चांगलं तेच घेण्याची निरक्षीरविवेकी सवय अर्थातच घरच्या संस्कारांनी अन् पुण्यातल्या वास्तव्याने शिकवली. त्यामुळे मी पुणेरी नसूनही पुण्याशी माझ एक अनोखं, जिव्हाळयाचं नातं निर्माण झालं म्हणूनच जेव्हा लग्न ठरलं अन् पुणं सोडून अगदी अनोळखी वाळवंटी देशात जावं लागणार असं जाणवलं तेव्हा मन उदास झालं. अर्थात ,आता कुठेही जावं लागलं तरी तिथे आपण निश्चितच ॲडजस्ट होऊ,ही भावनाही मला पुण्यानेच दिली होती. ती मला आजही कामी येते.

जेव्हा मी अबुधाबीला येणार होते तेव्हा इथल्या फक्त दोनच गोष्टी मला ठाऊक होत्या–एक म्हणजे इथला प्रचंड सोनेबाजार आणि दुसरी म्हणजे खनिजसंपन्न पण वाळवंटी देश अशी या प्रदेशाची असलेली ओळख. सोबतीला बऱ्याच गैरसमजुती देखील होत्या. उदा . बुरखा घालूनच वावरावं लागेल इ.इ त्यामुळे नवरोबांनी समजावूनदेखील डोक्यातून 'किडा' जातच नव्हता. पण मी अबूधाबी विमानतळावर पाऊल ठेवलं आणि माझ्या अनेक भ्रामक कल्पना 'तुषार कपूर' झाल्या. (म्हणजे गायब झाल्या! काय करु ? ही आमची कॉलेजमधली पुणेरी भाषा मधे मधे डोकावतेच.)

आतापर्यंत घर वा शाळा याशिवाय बाहेर कधीही न अनुभवलेली शिस्तबद्धता, कमालीची स्वच्छता, गुळगुळीत चकाचक रस्ते अन् 'हे वाळवंट आहे' असं सांगावं लागेल इतकी सुंदर वृक्ष लागवड व नियोजन इथे पाहायला मिळालं. इथलं सगळं काही भव्य दिव्य आणि स्वप्नवत. मी तर प्रथमदर्शनीच मोहात पडले.

आपला देश असो वा परदेश, गाव असो वा शहर, प्रत्येकाला स्वतःची एक संस्कृती असते, इतिहास असतो. सगळं काही कालपरत्वे घडत गेलेलं असतं. पुणे काय किंवा अबूधाबी काय, तेही यास अपवाद नाहीत. पुण्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा शनिवारवाडयातील पेशव्यांचा, लालमहालातील शिवरायांचा; तर इथे अबूधाबीला जगप्रसिद्ध करणाऱ्या पै.शेख झायेद बिन सुलतान अनल नाहयान या लोकसेवक राजाने केलेल्या कायापालटाचा इतिहास. आपल्याकडील मराठमोळी, पारंपरिक, शेकडो वर्षाचा वारसा जपणारी पुणेरी संस्कृती; तर इथे राजे–राजवाडे–शेखांची बदायुनी प्रभाव असलेली घरंदाज इस्लामी –अरबी संस्कृती. दोन्ही संस्कृती जरी भिन्न असल्या तरी शिकवण मात्र समानच आदरभाव,

अतिथिप्रेम अन् जाज्ज्वल्य देशाभिमान.

इ.स .१९६० मध्ये खनिजतेलाचा शोध लागेपर्यंत अबूधाबी हा एक रखरखीत वाळवंटी प्रदेश होता; पण त्यानंतर मात्र तेल व्यवहारातून मिळणाऱ्या अमाप उत्पन्नाचा सुयोग्य वापर करून अबूधाबीने कात टाकली अन् जगाच्या नकाशावर संयुक्त अरब अमिरातीची राजधानी म्हणून मानाचं स्थान पटकावलं. आपण पुण्याला 'विद्येचं माहेरघर' म्हणतो.अनेक मानांकित शैक्षणिक संस्था पुण्यात आहेत. अबूधाबीतही उत्तमोत्तम नामांकित ; सर्व साधनसुविधांनी, परिपूर्ण, अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणाऱ्या अनेक संस्था विदयादानाचं काम करतात.

पुणे म्हटंल की शिक्षणाबरोबरच आठवते ती तिथली प्रसिद्ध खाद्यसंस्कृती. चितळयांची बाकरवडी, रामनाथची मिसळ, वाडेश्वरची इडली , सुजाताची मस्तानी, वैशाली रूपाली अन् कॅम्पातली बिर्याणी...अनेक नावं लगच ओठांवर येतात. इथेसुद्धा अबूधाबी पुण्याला 'सेम पिंच' करु शकेल अशी खाद्याजत्रा आपल्याला दिसेल. अरेबिक ग्रिल्स, लेबनीज शावरमा, येमेनची मंडी, मेक्सिकन फुड फिएस्टा, चायनीज मंचुरियन/नूडल्स, जपानी सुशी, युरोपियन स्टिक्स अन् म्हणाला त्या भारतीय पदार्थांची इथे अगदी रेलचेल दिसून येईल. जगाच्या कानाकोपऱ्यातून अर्थार्जनासाठी आलेल्या मंडळींना उदरभरणासाठीही त्रास पडू नये याची जणू पूर्णपणे दक्षता घेतलेली असावी.

पुणेरी संस्कृती ही कलासक्त, अभिरुचिपूर्ण आहे. पुण्यात अनेक नामवंत कलावंतांचे कार्यक्रम, सवाई गंधर्व महोत्सव, गणेश फेस्टिव्हल, विविध नाटकं, व्याख्यानमाला पाहावयास मिळतात. अबूधाबीतही देशविदेशांच्या सुप्रसिद्ध गायकांचे गायनाचे कार्यक्रम, जगप्रसिद्ध चित्रकारांची चित्रप्रदर्शनं, दर्जेदार बॅलेज, बहारदार नृत्याविष्काराचे कार्यक्रम इ.विविध सांस्कृतिक कलाप्रयोग होऊ लागले आहेत.

मनुष्यस्वभावानुसार आपण परदेशात कुठेही गेलो तरी आपल्या माणसाला शोधतो. आपल्याला आपल्या गावाचा वा देशाचा एक जरी माणूस दिसला तरी मन हरखून जातं. अबूधाबीतल्या महाराष्ट्र मंडळाच्या निमित्ताने आम्हाला या देशातही आमचं मराठीपण साजरं करता येतं. अगदी संक्रांतीच्या हळदी—कुंकवापासून ते गणपती—दिवाळीपर्यंत प्रत्येक सणाची मौज लुटता येते.मनाला एक समाधान मिळंत. पुणे ते अबूधाबी हे मानसिक अंतर त्यमुळे आपोआपच कमी होतं. इतक्या वर्षाच्या अबूधाबीतील वास्तव्यानंतर तर आता हे अंतर खूपच कमी झालेलं आहे.'पुणे तिथे काय उणे' हे ऐकत ऐकत मी घडले. त्याच चालीवर 'अबूधाबीतही सर्व काही' हेही मी मनोमन कबूल करते ते पुण्याने मला दिलेल्या संचिताच्या बळावरच!



पल्लवी बारटक्के.........



SHRUTIKA TAWADE



RISHABH GHATE